Reg. No.: MH-NGP/000016?
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# वाढती बेरोजगारी एकसमस्या व त्यावरीलउपाय

मनिषा नि. अवगान
संशोधन केन्द्र महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली
*Corresponding Author: manisha.awagan@gmail.com

Communicated : 02.01.2023 Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 Published: 27.01.2023

**सारांश :-**

बेरोजगारीही एक सामाजिक घटना आहे. बेरोजगारी ही समाजातील अर्थव्यवस्था, उत्पन्नाची मर्यादा आणि मनुष्यबळ यांच्याशी संबंधित असलेली एक सामाजिक संकल्पनाआहे. प्रत्येकच समाजात काही प्रमाणात बेरोजगारी दिसून येते. परंतु समाजातील बहुसंख्य लोकांच्या हाताला काम मिळत नाही तेव्हा ती त्यासमाजाची समस्या बनते. आज केवळ भारतातच नव्हे तर बेरोजगारी ही सार्वत्रिक स्वरूपाची समस्या बनली आहे. इंग्लड, अमेरिका सारख्या विकसित देशातही बेरोजगारी दिसून येतेम्हणून विकसित, अविकसित आणि मागासलेला असा कोणताही देश असो तिथे बेरोजगारी चा प्रश्न आव्हानात्मक उभा आहे. बेरोजगारी ही अशी अवस्था आहे. की ज्यात एक व्यक्ती काम करण्यास योग्य असतो परंतु त्याला काम मिळत नाही. बेरोजगारी एका स्वस्थ, सबल आणि सक्षम व्यक्तीसाठी हा खूप मोठा अभिशाप आहे. शिक्षणाचा विस्तार, मागासलेली शेती व अविकसित उदयोग धंदे अशा कारणांमूळे भारतात बेरोजगारी ची समस्या दिवसेंदिवस जटिल होत आहे. आधुनिक काळात तर बेरोजगारीची समस्या वाढतच चाललेली आहे. जगात बेरोजगारी पेक्षा आणखी कोणती ही मोठी बर्बादी नाही काम करण्यास व्यक्ती इच्छुक असून ही त्याला काम न मिळाल्याने त्याच्या वैयक्तिक जीवनावर कौटुंबिक जीवनावर व पर्यायाने सामाजिक जीवनावर दुष्परिणाम होतो. बेरोजगारीच्या समस्येमूळे व्यक्तीच्या जीवनावर अनेक समस्या निर्माण होते. बेरोजगारी हा भारतीय समाजाला लागलेला अभिशाप आहे. त्याला नष्ट करण्यासाठी नियोजित प्रयत्नाची गरज आहे. देशातील बेरोजगारीची समस्येवर मात करण्यासाठी शासनस्तरावरून केलेल्या उपाययोजनांसोबत आणखी उपाय करणे काळाची गरज आहे

**बीजसंज्ञा :-** बेरोजगारी, समस्या, दुष्परिणाम, अभिशाप, उपाययोजना.

## प्रस्तावना :-

औदयोगिकक्रांती पूर्वी शेती हाच लोकांचा मुख्य व्यवसाय होता. तसेच लोक लघुउदयोग व कुटीरउदयोग करित असे. एकविसाव्या शतकाच्या तुलनेत लोकसंख्या देखील कमी होती. आणि लोकांच्या गरजा देखील मर्यादित होत्या. त्यामूळेच कृषीप्रधान अर्थव्यवस्थेच्या काळात बेरोजगारीची समस्या नव्हती असे म्हणता येते. परंतु दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत गेली. या वाढत्या लोकसंख्येला वस्तुपुरवठा करण्यासाठी मानवाने यंत्राच्या साहयाने वस्तूचे उत्पादन वाढविले.त्यामुळे लघुउदयोग व कुटीरउदयोग बंद पडले. तसेच शेतीवरचा भार वाढला. उदयोगप्रधान व भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या युगात बेरोजगारीची समस्याही त्या अर्थव्यवस्थेचा भाग बनली आहे.

प्रत्येक समाजात काही प्रमाणात बेरोजगारी असणे अपरिहार्य असते. परंतू समाजातील बहुसंख्य लोकांच्या हाताला जेव्हा काम मिळत नाही तेव्हा ती त्या समाजाची समस्या बनते. आज केवळ भारतातच नव्हे तर बेरोजगारी ही सार्वत्रिक स्वरूपाची समस्या बनली आहे. अविकसित, विकसनशील आणि विकसित अशा सर्वच राष्टांमध्ये बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे

. फक्त बेरोजगारीचे स्वरूप देशपरत्वे आणि काळापरत्वे वेगवेगळे असते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ६०-६५ वर्षात भारतात बेरोजगारीच्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. भारतात बेरोजगारीची समस्याही एक मुलभूत समस्या आहे. भारतातील शासन, राजकीय नेते, राजकीय पक्ष आणि निवडणूकीच्या वेळी प्रत्येक राजकीय पक्ष बेरोजगारीच्या समस्येला विशेष महत्व देतात. परंतू सत्ता मिळाल्यानंतर मात्र त्या राजकीय पक्षाला हा प्रश्न सोडविता येत नाही. उलट बेरोजगारीची समस्या उग्र रूप धारण करित आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

१) बेरोजगारीची समस्या निर्माण करणा-या कारणांचा शोध घेणे.

२) बेरोजगारीमूळे निर्माण होणा-या दुष्परिणामांचा अभ्यास करणे.

३) बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१) बेरोजगारीची समस्या निर्माण होण्यास अनेक कारणे जबाबदार आहेत.

२)बेरोजगारीच्या समस्येमूळे बेरोजगारांच्या वैयक्तिक, कौटुंबिक जीवनावर गंभीर परिणाम झाल्याचे दिसून येते

३) दीर्घकालीन उपयांनी बेरोजगारीची समस्या काही प्रमाणात सोडविण्यास मदत होते.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधसाठी वर्णनात्मक संशोधनपध्दतीचा उपयोग केला असून तथ्य संकलनासाठी पुस्तके, संदर्भग्रंथ इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

**बेरोजगारीच्या व्याख्या :-**

**१) डिमेलो :-**

"बेरोजगारीही अशी अवस्था आहे की ज्यात व्यक्तीला कामकरण्याची इच्छा असूनही आर्थिक मोबदला मिळवून देणारे काम मिळत नाही."

**२) डॉ. आर. सी. सक्सेना :-**

"जी व्यक्ती काम करण्याच्या दृष्टीने लायक असून सुध्दा त्या व्यक्तीला प्रचलित मजूरीच्या दराने काम न मिळणे म्हणजेच बेरोजगारी होय."

**भारतातील बेरोजगारीचा दर**

| वर्ष | बेरोजगारीचा दर |
|---|---|
| 2016 | 5.42% |
| 2017 | 5.36% |
| 2018 | 5.33% |
| 2019 | 5.27% |
| 2020 | 8.00% |
| 2021 | 5.98% |

**बेरोजगारीचे कारणे :-**

**१) लोकसंख्या वृध्दी** :-

भारतातील बेरोजगारीच्या संदर्भात लोकसंख्येची वृध्दी हे सर्वात महत्वाचे कारण मानले जाते. सन १९०१ मध्ये भारताची लोकसंख्या केवळ २४ कोटी होती. ती आजच्या घडीला १२३ कोटींवर पोहचली

आहे. यावरून भारतात लोकसंख्येचा विस्फोट झाल्याचे समजते, परंतू लोकसंख्या वाढीच्या तुलनेत रोजगाराच्या संधी उपलब्ध होताना दिसत नाही. ज्या गतीने लोकसंख्या वाढत आहे. त्यागतीने रोजगाराच्या संधी वाढत नाहीत. त्यामुळे बेरोजगारांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**२) कृषी क्षेत्रातील मागासलेपण** :-

भारतातील ७० टक्के लोक शेती व्यवसाय करतात. परंतु ही शेती पारंपारिक पध्दतीनेच केली जाते. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात औदयोगिकविकास घडवून आणण्याच्या नादात कृषी विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले. बहुतांश सोयी निर्माण झाल्या नाहीत. कोरडवाहूजमिनीपेक्षा ओलिताच्या सोयी निर्माण झाल्यातर अधिक रोजगार निर्माण होतो. परंतू कृषी क्षेत्रातील मागासलेपणामूळ बेरोजगारी ची समस्या वाढल्याचे दिसते.

**३) सदोष शिक्षण पध्दती** :-

आजची शिक्षणपध्दती ही दोषपूर्ण आहे. कारण शिक्षणातून पदवीधर तरूण निर्माण केले जातात. आजचे शिक्षण हे रोजगारभिमुख नाही. प्रत्येक सुरक्षित तरूणाला केवळ नोकरी हवी असते श्रमाचे काम करण्यात ते तयार नसतात. म्हणून आज सुशिक्षित बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे.

**४)व्यवसायाभिमुख शिक्षणाचा अभाव** :-

व्यवसायभिमुख शिक्षणामुळे व्यक्तीला स्वत:चा व्यवसाय स्वत: निर्माण करता येऊ शकतो. व्यवसायाभिमुख शिक्षणात शिक्षण व व्यवसाय याची जोड लावण्यात येते. परंतू आपल्या देशात व्यावहारिक शिक्षणाची कमी असल्यामूळे कुशलकारागीर विपूलप्रमाणात मिळत नाहीत,तर इतर क्षेत्रात शिक्षित व्यक्ती बेकार राहतात.

**५) ग्रामीण उदयोगधंदयांचा अभाव** :-

ब्रिटिशांच्या आगमानानंतर भारतीय परंपरागत ग्रामीण उदयोगधंदे नष्ट झाली, ग्रामीण कारागीरी नष्ट झाली, परंतू त्या व्यवसायाची व रोजगार निर्माण करण्याची कोणतीही प्रभावी व्यवस्था निर्माण होवू शकली नाही. तसेच भारतात कारखानदारी पध्दती सूरू झाली आणि रोजगारीसाठी ग्रामीण लोक शहरांकडे जावू लागली. परंतू सर्वच लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकला नाही.

**६) श्रमाच्यामागणी-पुरवठयात असंतूलन** :-

जेव्हा उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संख्येपेक्षा कामकरण्यात इच्छुक असणा-या लोकांची संख्या अधिक असेल तर सर्व लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळ बेकारांच्या संख्येत वाढ होताना दिसते.

**७) सदोष नियोजन** :-

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजित पध्दतीन विकासकरणाचा प्रयत्न झाला. रोजगार, शिक्षण, व्यवसाय, उदयोग इत्यादींच्या संदर्भात नियोजन करण्यात आले असले तरी त्यांची योग्य अंमलबजावणी केली

जात नाही . सदोष नियोजनामुळे बेरोजगारीमध्ये सतत वाढ होत आहे.

**८) आर्थिकमंदी :-**

आर्थिक मंदीच्या काळात देशात उत्पादित वस्तूंची मागणी कमी असते, वस्तुंच्या किंमतीही कमी असतात त्यामुळे उदयोजक उत्पादन कमी प्रमाणात करतात . त्यांचेही खूप नूकसान होते. अशावेळी ते कामगारांना कामावरून काढून टाकतात.

**बेरोजगारीचे दुष्परिणाम :-**

**१)व्यक्तिगतविघटन :-**

बेरोजगारीचा व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनावर फार मोठा वाईट परिणाम होतो . रोजगारा अभावी व्यक्तीचा अपेक्षाभंग होतो, व्यक्ती निराश व उदास बनते, आपल्या आवश्यक गरजापूर्ण न करता आल्याने व्यक्ती चूकीच्या मार्गाचा वापर करतो . बेरोजगार व्यक्ती नेहमी मानसिक ताणतणावात राहतो . यातूनच व्यक्ती विघटन होते व काही लोक आत्महत्येस प्रवृत्त होतात.

**२) कौटुंबिक विघटन:-**

बेरोजगारीचा दुष्परिणाम कौटुंबिक जीवनावरही होत असतो . कुंटुंबातील लोक बेरोजगार व्यक्तीला टोचून बोलतात . त्यातूनच कौटुंबिक कलह निर्माण होते, कुंटुंबात तणावाची स्थिती निर्माण होते . कुंटुंबाच्या आर्थिक किमान गरजाही पूर्ण होत नाही . बेरोजगार व्यक्ती विवाहित असल्यास पती-पत्नी मध्ये नेहमी भांडण होते, मुलांचे पालन-पोषण होत नाही . पती-पत्नीच्या भांडणाचा मुलांवर वाईट परिणाम होतो.

**३) सामाजिक विघटन:-**

बेरोजगारीचा सामाजिक जीवनावर देखील परिणाम होतो . बेरोजगारीमूळे समाजात अनेक समस्या निर्माण होतात . बेरोजगार व्यक्ती उदासीन,ताण-तणावात असल्यामूळे इतर लोकांशी फारसे संबंध ठेवत नाही, एकाकी होतात. बेरोजगारीमूळे गुन्हेगारी, वेश्यावृत्ती, भ्रष्टाचार, जातीवाद, बालकामगार इत्यादी समस्या वाढतात.

**बेरोजगारी दूर करण्याचे उपाय :-**

**१) लोकसंख्या वाढीवर नियत्रंण :-**

आज देशाची लोकसंख्या मोठयाप्रमाणात वाढली आहे . त्यामूळे कितीही रोजगाराच्या संधी निर्माण केल्यातरी त्या लोकसंख्या वाढीच्या तुलनेत कमीच पडणार आहे . जोपर्यंत लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले जाणार नाही तोपर्यंत रोजगार सर्वांना पूरविता येणार नाही. म्हणून बेरोजगारी दुर करण्यासाठी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण करणे आवश्यक आहे.

**२) कृषी क्षेत्राचाविकास :-**

भारत देश कृषी प्रधान देश आहे आजही देशातील ७० टक्के लोक उदरनिर्वाह साठी शेतीवरच अवलंबून आहे . देशातील बहुसंख्य बेरोजगार ग्रामीण भागातच आहे . म्हणून कृषी क्षेत्राचा विकास हाच ख-या अर्थाने देशाचा विकास आहे . असे समजून कृषीव्यवसायाचा विकास केल्यास लोकांना

रोजगार मिळू शकतो जलसिंचनसुविधा, नवनविन तंत्रज्ञानाचा उपयोग आधुनिक पध्दतीने शेती इत्यादीमुळे शेतीचे उत्पादन वाढू शकते आणि बेरोजगारीवर नियंत्रण ठेवता येते.

**३) लघू व कुटीरउदयोगाची वाढ :-**

शेतीचे काम हंगामी असल्यामुळे इतर काळात उपजीविकेचे साधन म्हणून विविध उदयोगधंदे सुरू करण्याची खूपच गरज आहे . सूतार, कुंभारकाम, दुग्धव्यवसाय, दोर वळणे या सारखे लघूउदयोग व कुटीर उदयोग सुरू केल्यास मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होतो.

**४) रोजगाराभिमूख शिक्षण :-**

औपचारीक शिक्षणपध्दतीत व्यावसायिक शिक्षण व तांत्रिक शिक्षणाला विशेष स्थान मिळू शकले नाही. असे शिक्षण घेवून बाहेर पडणारे सूशिक्षित नोकरीशिवाय दुसरे काहीही करू शकत नाही . म्हणूनरोजगाराभिमूख शिक्षणाची खूपच गरज आहे . अशा शिक्षणातून सुशिक्षित शासनावर अवलंबून न राहता स्वत: रोजगार मिळवू शकतो.

**५)व्यावसायिक शिक्षण :-**

भारतात व्यावसायिक शिक्षणाची कमतरता असल्यामूळे कुशल कामगार मिळत नाही . म्हणून कुशल कारागीर निर्माण करणा-या व्यावसायिक प्रशिक्षणाची आज खूपच गरज आहे . व्यक्ती ने केवळ सरकारी नोकरीवर अवलंबून न राहता स्वत:चा व्यवसाय निर्माण इतरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने व्यावसायिक शिक्षण खूप महत्वाचे आहे . यातून बेरोजगारी दुर होण्यास मदत होते.

**६) बचतीलाप्रोत्साहनदेणे :-**

सामान्य लोकांना बचतीसाठी प्रोत्साहन दिल्यास लोक पैशाची बचत करून स्वत:चा व्यवसाय सूरू करू शकेल . लोकांनी अधिक प्रमाणात बचत केल्यास गुंतवणूक करणे शक्य होते व यातून मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होते.

**७) राष्ट्रीय धोरण :-**

बेरोजगारीची समस्या दुरकरण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र येवून राष्ट्रीय धोरण ठरवावे, त्यानूसार त्याची कार्यवाही करावी . बेरोजगारीच्या या राष्ट्रीय धोरणास सर्वपक्षांनी राजकीय मतभेद विसरून समर्थन करावे.

**८) तात्पुरत्याकामाच्यासोयी :-**

भारतातील शेती ही निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून आहे . त्यामुळे कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ पडतो . त्यामुळे लोकांना बेरोजगार राहावे लागते . अशावेळी तात्पुरती कामे सुरू करून लोकांना रोजगार देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

१. अशाप्रकारे प्रत्येक समाजात काही प्रमाणात बेरोजगारी असणे अपरिहार्य असते . परंतू समाजातील बहुसंख्या लोकांच्या हाताला काम मिळत नाही तेव्हा ती समाजाची समस्या बनते . आज विकसित, अविकसित व

मागासलेल्या राष्ट्रातही बेरोजगारीचा प्रश्न आव्हात्मक स्वरूपात उभा आहे . वाढत्या बेरोजगारीच्या समस्येचे दुष्परिणाम जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये दिसून येतात . जगात बेरोजगारी पेक्षा आणखी कोणतीही मोठी बर्बादी नाही . बेरोजगारी लक्षात घेवून त्यावर मात करण्यासाठी शासनस्तरावरून विविध उपाययोजना करण्यात याव्या . या उपायाने बेरोजगारीच्या समस्येचे निमुर्लन झाल्यास देशात दारिद्रयाचा प्रश्न राहणार नाही . अर्थातच एक समस्याही दुस–या समस्येवर अवलंबून असल्यामूळे देशाचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होईल

**संदर्भ :–**

आगलावे, पी . (२०१८) . भारतीय समाज : संरचनात्मक प्रश्न आणि समस्या . नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन .

क–हाडे, बी एम . (२०१३) . भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या . नागपूर : पिंपळापूरे ॲण्ड कं . पब्लिशर्स .

लोटे, रा . ज . (२०१८) . भारतीय समाज : संरचनात्मक आव्हाने . नागपूर :पिंपळापूरे ॲण्ड कं . पब्लिशर्स .

https://www.macrotrends.net>IND